सत्यमेव जयते

# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन), अधिनियम, २०१५

"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

**ई-मेल :** fra.govmh@gmail.com
**संकेतस्थळ :** www.mahafra.org
**संपर्क :** ०२२-३१९८०३४८ / ८८२८७ ८६२६४

## शुल्क नियामक प्राधिकरणाच्या ४८ व्या बैठकीचे इतिवृत्त

**दिनांक :०७ ऑक्टोबर, २०२६**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश आणि शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम ११(२)(३)(४) या मजकुराऐवजी सुधारणा अधिनियम, २०२६ अंतर्गत स्थापन केलेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाची ४८ व्या बैठक दि.०७ ऑक्टोबर, २०२६ रोजी बैठक रुम क्र.३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे संपन्न झाली.

**खालील सदस्य उपस्थित/अनुपस्थित होते :**

| | | |
|---|---|---|
| १ | मा.श्री. शेखर माधूरी मनोहर चन्ने, भा.प्र.से, सेवानिवृत्त सचिव, अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| २ | डॉ. मुरलीधर मुक्ताबाई गोविंदराव चांदेकर, माजी कुलगुरु, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ३ | श्री.नितीन बापुराव चव्हाण सनदी लेखापाल सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ४ | श्री. श्रीकांत निर्मल मोहन लिमये सनदी लेखापाल सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ५ | श्री.अतुल दामोदर धारप परिव्यय लेखापाल, सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | विडिओ कॉन्फरन्सिंगव्दारे उपस्थित |
| ६ | श्री. अश्विन मधुसूदन सोलंकी परिव्यय लेखापाल, सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ७ | डॉ. दत्तात्रय वेनुबाई व्यंकटराव जाधव, व्यावसायिक शिक्षण तज्ज्ञ सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ८ | संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण (म.रा.) पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

| | | |
|---|---|---|
| १० | आयुक्त वैद्यकीय शिक्षण (म.रा.)<br>पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ११ | संचालक, आयुष (म.रा.)<br>पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण<br>प्रतिनिधी डॉ. संदीप काळे, सहाय्यक प्राध्यापक,<br>आर.ए.पी.एम.सी., मुंबई. | विडिओ कॉन्फरन्सिंगव्दारे उपस्थित |
| १२ | महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेचे सदस्य सचिव, पुणे आणि पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण. | अनुपस्थित |
| १३ | श्री समीर कुर्तकोटी, भा.प्र.से.<br>सदस्य सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |

विषय क्र.१: **शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी शुल्क निश्चित करण्याच्या निर्णयाविरुद्ध महाविद्यालये/संस्थांनी दाखल केलेल्या पुनर्विलोकन अर्जांचा (Review Application) विचार करणे.**

i) आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, धुळे (PH5186) यांनी M.B.A/Pharm.D. अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र. १२/२०२६.**
"खालील व्यक्ती व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होत्या.

१. डॉ. संजय जे. सुराणा, संस्थेच्या प्राचार्य,
२. डॉ. नितीन जी. हसवाणी, संस्थेच्या व्यवस्थापन प्रतिनिधी,

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले.

संस्थेने सादर केलेल्या माहितीनुसार, Pharm.D. महाविद्यालयातील शिक्षकांचे वेतन M.B.A महाविद्यालयाच्या खर्चामध्ये दर्शविण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे सदर बाब योग्य असल्याचे आढळून येत नसल्याने, संस्थेचा M.B.A. अभ्यासक्रमाकरिता दाखल केलेला पुनर्विलोकन **अर्ज नामंजूर करण्यात येत आहे**. तसेच, Pharm.D. अभ्यासक्रमाकरिता दाखल केलेला पुनर्विलोकन अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

त्यानुसार, संस्थेच्या Pharm.D. अभ्यासक्रमाचे शुल्क खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे :-

| Review Application No. | Name of the Institute | Course | After hearing, Fees Revised for the A.Y. 2026-2027 |
|---|---|---|---|
| १२/२०२६ | आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, धुळे<br>**Code No.** PH5186 | **2026-27** | **1,10,000/- Per student** (Pharm.D) |

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

संस्थेच्या वतीने इतर बाबींवर युक्तिवाद करताना असे नमूद करण्यात आले की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये संस्थेच्या खर्चात वाढ झाली असून, त्याची प्रमुख कारणे म्हणजे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनात झालेली वाढ तसेच कंत्राटी मनुष्यबळाची नियुक्ती व त्यावर झालेला खर्च ही आहेत. तसेच, काही नवीन शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांना अधिक वेतनावर नियुक्त करण्यात आले आहे. जुन्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातही वाढ करण्यात आली आहे. कंत्राटी मनुष्यबळावर झालेला खर्च हा प्रत्यक्ष वेतनावरील खर्च असल्याने सदर खर्च मान्य करण्यात यावा, अशी विनंती संस्थेच्या वतीने करण्यात आली.

यावर प्राधिकरणाच्या वतीने सदर बाबींची सविस्तर माहिती पुढील सुनावणीच्या वेळी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

त्यानुसार, पुनर्विलोकन अर्ज पुढील **सुनावणीच्या तारखेपर्यंत तहकूब (Adjourned) ठेवण्यात येत आहे**".

ix) आयडियल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, कोंडिग्रे, शिरोळ, कोल्हापूर (MB6734) यांनी M.B.A अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र. ६१/२०२६.**

"खालील व्यक्ती संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होत्या.

१. श्री. कल्लाप्पा वसुताई गावडे – संस्थेचे अध्यक्ष

२. श्री. राहुल कोंडिराम खामकर – संस्थेचे लेखापाल

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले.

संस्थेच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या शुल्काची रक्कम रुपये १४,२३,६७६/- ही 'इतर जमा' या शीर्षकाखाली दर्शविण्यात आली आहे. सदर रक्कम विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या शुल्काची असल्याने, यापूर्वी अमान्य करण्यात आलेली ही रक्कम मान्य करण्यात यावी, अशी विनंती संस्थेच्या अध्यक्षांनी केली.

त्यानुषंगाने, संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावाची तपासणी केली असता, सदर रक्कम विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या शुल्काची असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे रुपये १,०३,४९,४९४/- इतकी रक्कम अतिरिक्त असल्याचे आढळून आले. सबब, सदर रक्कम वजा करून रुपये १,८३,७६३/- इतका खर्च मान्य करण्यात आला.

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

Ideal Institute of Management IIMK KONDIGRE Tal.Shirol, Dist.Kolhapur

त्यानुसार, शुल्काची पुनर्गणना केली असता, संस्थेचे **पुनर्विलोकन अर्ज मंजूर** करण्यात आले असून, शुल्क खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे:-

| Review Application No. | Name of the Institute | Course | After hearing, Fees Revised for the A.Y. 2026-2027 |
|---|---|---|---|
| ६१/२०२६ | आयडियल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, कोंडिग्रे, शिरोळ, कोल्हापूर<br>**Code No. MB6734** | 2026-27 | 71,500/-<br>Per student |

Secretary
Vasudev Gavade Education & Charitable Trust,Ichalkaranji-Kolhapur-416115

शु.नि.प्रा.
०७.१०.२०२६

xvi) MKSSS'S कमिन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग फॉर वुमन, कर्वेनगर, पुणे (EN6276) यांनी B.Engg. अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र. १७०/२०२६.**

"खालील व्यक्ती व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होत्या.

१. डॉ. माधुरी बी. खंबेटे — संस्थेच्या प्राचार्या
२. डॉ. व्यंकट श्रीनिवास शास्त्री पसुमर्ती — संस्थेचे सचिव

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले.

सुनावणीदरम्यान असे निदर्शनास आले की, संस्थेने आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी आणखी मुदत देण्याची विनंती केली असून, सदर विनंती प्राधिकरणाने मान्य केली आहे.

तथापि, आवश्यक कागदपत्रे सादर होईपर्यंत पुनर्विलोकन अर्ज **तहकूब (Adjourned) ठेवण्यात येत आहे".**

दिनांक: ०७ ऑक्टोबर, २०२६
ठिकाण: मुंबई

(शेखर माधुरी मनोहर चन्ने, भा.प्र.से.(से.नि.सचिव)
अध्यक्ष,
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य